N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** बिबी पोलीस स्टेशन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0189 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/10/2023 02:22

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** रविवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 29/10/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/10/2023
   **Time From (वेळेपासून):** 13:51 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:04 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/10/2023 **Time (वेळ):** 02:22 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 001

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/10/2023 02:22 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** सेवालाल चौकातील बिबी ते किनगाव, बिबी ,लोणार

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मिलन उत्तम चव्हाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्याचा प्रकार)** | **Address (पत्ता)** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | गोवर्धन नगर ,लोणार ,बिबी पोलीस स्टेशन,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | गोवर्धन नगर ,लोणार ,बिबी पोलीस स्टेशन,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address (वर्तमान पत्ता)** |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक श्री ज्ञानबा राजाराम सोसे | | | 1. बालाजी नगर ,देऊळगांव राजा , देऊळगांव राजा,बुलढाणा, महाराष्ट्र,भारत |
| 2 | विजय फकीरा उबाळे | | | 1. बिबी ,लोणार ,बिबी पोलीस स्टेशन,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रु.)** |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी 3500रु | 3,500.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,500.00

**11.Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा
दिनांक 30.10.2023
मिलन उत्तम चव्हाण, वय ३५ वर्षे, रा. गोवर्धन नगर ( चोर पांग्रा), ता.लोणार जि. बुलढाणा मो.नं.
9579979651
मी समक्ष टंकलिखीत फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असून वर नमुद ठिकाणी आई वडीलासह राहतो व शेतीचा व्यवसाय करतो. मी दिनांक 28-10-2023 रोजी श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा यांना फोनव्दारे माहिती दिली की, माझी पत्नी नामे सौ वैशाली मिलन चव्हाण हिने अंदाजे पाच ते सहा वर्षापूर्वी माझे व माझे आई वडील व माझे इतर नातेवाईकाविरुध्द दिलेल्या तक्रारीवरुन माझे सह दहा जनाविरुध्द कलम 498 भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्हा कोर्ट निकालावर प्रलंबित आहे. सदर गुन्हयामध्ये आमचेविरुध्द निघालेल्या जमानती वॉरन्ट वरुन आम्हास अटक न करण्यासाठी पोलीस स्टेशन बिबिचे पोलीस कर्मचारी श्री. सोसे साहेब हे 35,000/- रूपये लाचेची मागणी करित असल्याबाबत माहीती दिली. त्यावरुन दिनांक 29-10-2023 रोजी आगार व्यवस्थापक, राज्य परीवहन महामंडळ, बुलढाणा यांचे कार्यालयातील दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणुन उपलब्ध करुन घेवुन पोलीस उपअधिक्षक श्रीमती घोगरे मॅडम, सापळा पथक तसेच दोन्ही पंच असे शासकिय वाहनाने ग्राम मलकापुर पांग्रा शिवारात हजर आलो. त्यावेळी मी सुध्दा ठरल्याप्रमाणे कार्यवाही पथकाजवळ हजर आलो. त्यावेळी पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम यांनी मला त्यांचा तसेच कार्यवाही पथकातील सदस्यांचा व पंचाचा परीचय करुन दिला. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम यांनी माझी वरीलप्रमाणे लेखी तक्रार नोंद करुन घेतली. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम यांनी मला व पंचाना पडताळणी कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहीती दिली. त्यादरम्यान मला लोकसेवक सोसे, पोलीस कर्मचारी यांचा फोन आला त्यावेळी मी फोन रिसीव्ह करुन स्पिकर ऑन मोडवर पंचासमक्ष व सापळा पथकासमक्ष त्याचेशी बोलणी केली असता ते मला म्हणाले की, तु कोठे आहे. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, मी शेतात आलो होतो साहेब. त्यावेळी सोसे साहेब हे मला म्हणाले की, मी तुझ्या गावात आलो आहे तु ये घरी लवकर असे म्हणून मला माझे घरी भेटायला बोलाविल्याने सर्वानुमते लोकसेवक श्री. सोसे यांची माझे घरी ग्राम गोवर्धन नगर येथे लाच मागणी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पूर्व पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीप्रमाणे यातील लोकसेवक श्री. सोसे पोलीस कर्मचारी हे माझेकडे लाच मागणी करतात काय? याबाबत लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजित करणे असल्याने पोउपअधि श्रीमती घोगरे मॅडम यांनी व्हॉईस रेकार्डर चालू करुन नापोकॉ. लोखंडे यांचे करवी शर्टाचे आतून बाहेरुन दिसणार नाही अश्याप्रकारे लटकावून दिले व पंच क्र. 1 श्री. निळकंठ इंगळे यांचेसह माझे खाजगी मोटार सायकलने 09.51 वा. ग्राम मलकापुर पांग्रा शिवारातून माझे गोवर्धन नगर (चोर पांग्रा) येथील घराकडे रवाना केले. त्यावेळी मी व पंच असे आम्ही दोघे माझे मोटार सायकलने घरासमोर पोहचून मोटार सायकल पार्क केली असता मला आमचे घराचे थोडे अंतरावर श्री सोसे साहेब उभे दिसल्याने मी व पंच क्र. 1 श्री. इंगळे असे आम्ही सोसे साहेबाजवळ गेलो. त्यावेळी माझे वडील सुध्दा त्याठिकाणी हजर आले. त्यावेळी सोसे साहेब व माझेत वॉरन्ट मध्ये अटक न करण्यासंबधाने बोलनी केली. त्यावेळी सोसे पोलीस कर्मचारी, मला व माझे वडीलांना म्हणाले की, तुम्ही माझे सोबत बिबी येथे चला असे म्हणून मला व माझे वडीलांना बिबी येथे चालण्यास सांगीतल्याने मी व पंच क्र.1 श्री. इंगळे असे माझे मोटार सायकलने व सोसे साहेब व माझे वडील असे सोसे साहेब यांचे मोटार सायकलने बिबी येथे आलो असता सोसे साहेब आम्हाला त्यांचे एम.एस.ई.बी. कार्यालयाचे बाजुला असलेल्या खाजगी रुमवर घेवून गेले. त्यावेळी सोसे साहेब यांनी आम्हाला त्यांचे बॅग मधील आमचे वॉरन्ट काढून दाखविले. त्यावेळी माझेत व सोसे साहेब यांचेत वॉरन्ट मध्ये अटक न करण्यासंबधाने बोलणी केली असता झालेल्या बोलणी दरम्यान सोसे साहेब

हे मला म्हणाले की, मंग आज तुम्हाले जर समजा तुमचे दहा लोक अटक केले, तर तुमचे विनाकारण किती? त्यावेळी मी त्यांना म्हणलो की, हाव न, त्यावेळी लोकसेवक सोसे मला म्हणाले की, आपल्याला काय करायच याच्यामधी तुम्हाले सांगतो, सत्ताविस तारखेले म्हणजे याच्या आधी तुम्हाले अटक केल असल आम्ही, सत्ताविस तारखेले तुम्हाले लिहून देतो व्यवस्थीत त्यावेळी मी त्याना म्हणालो की, जमानतदार त्यावेळी सोसे साहेब मला म्हणाले की, नाही काहीच न्यायच काम नाही मी सगळे कागदपत्र तयार करुन देणार ये तुमच्याजवळ, त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, जमानतदार घेवून जायच का? त्याचेतल नॉलेज नाही साहेब आपल्याले, त्यावेळी लोकसेवक श्री सोसे हे मला म्हणाले की, मिलन पहिल्या दिवशी मी तुले काय बोलली व्हती? मी सगळ करुन घेतो, हा परवा दिवशी आलता मह्याकंड म्हणे तुम्हाला बोलायच, याले कश्याले बोलु मी. साहेब म्हणे काहीतरी करा म्हणल तु एक काम कर मले एक रुपया नी खर्चायचा त्यातला, साडे तिन हजार रुपये देवून टाक मी सगळ लाईनवर लावतो. त्यावेळी माझे वडील त्यांना म्हणाले की, पैसा दयायचा काय? त्यावेळी लोकसेवक सोसे म्हणाले की, हाव न देवून टाका ते पैश्याच तेवढं, त्यावेळी माझे वडील त्यांना म्हणाले की, नाही की गोष्ट अशी झाली की, कन्फ्युज झाले आता एका माणसाचे साडे तीन का? त्यावेळी लोकसेवक सोसे म्हणाले की, हा त्यावेळी माझे वडील त्यांना एवढे कसे असे म्हणले असता, लोकसेवक सोसे म्हणाले की, तुमच्या एका मानसाचा जास्तीत जास्त दोन अडीचशे रुपये खर्च पकडलाय म्या मंग दोन अडीचशे रुपये आणखीन येच्या पेक्षा जास्त काय करणार ये मी, एका मानसाले अडीचशे रुपये खर्च तुमचा इथच निपटारा झालाय, त्यावेळी माझे वडील हे सोसे साहेब यांना म्हणाले की लगेच पैसे झाले की, तुम्हाले फोन लावतो तुम्ही कुठ आहे म्हणून त्यावेळी लोकसेवक सोसे साहेब आम्हाला म्हणाले की, तुम्ही एक काम करा तुम्ही इकड काही चकरा मारू नका, तुम्ही त्याच्याजवळ ठेवून जाता का? साडे तिन हजार रुपये त्याच्याजवळ, सरळ सरळ त्याच्याजवळ ठेवून दया, असे म्हणून मला आमचे विरुद्ध निघालेल्या वॉरन्ट मध्ये अटक न करण्यासाठी तडजोडीअंती 3500/- रुपये लाचेची मागणी करून लाच रक्कम आमचे गावातील सोपान डहाळके यांचे पानटपरीवर देण्यास सांगीतल्याने मी व माझे वडील तसेच पंच क्र. 1 असे माझे मोटार सायकलने सोसे साहेब यांचे रुमपासून थोडे अंतरावर येवून मी माझे वडीलाना बिबी बस स्टॉपवर सोडून दिले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 श्री.इंगळे कारवाई पंचक थाबून असलेल्या ठिकाणी परत आलो. त्यावेळी पोउपअधि श्रीमती घोगरे मॅडम यांनी माझेत व लोकसेवक श्री. सोसे यांचेत लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकून लोकसेवक श्री. सोसे. पोलीस कर्मचारी यांनी तडजोडीअंती 3500/- रुपये लाचेची मागणी करून लाच रक्कम चोर पांग्रा येथील सोपान डहाळके यांचे पानटपरीवर देण्यास सांगीतले असल्याबाबत खात्री केली. त्यानुसार सदर प्रकरणात सर्वानुमते आजच सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर श्रीमती घोगरे मॅडम यांनी माझेकडे लोकसेवक श्री. सोसे यानी लाच मागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्यासाठी 3500/- रुपये हजर करण्यास सांगीतले. असता, मी माझेजवळ असलेले 3500/- रुपये ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 7 भारतीय चलनातील नोटा अश्या श्रीमती घोगरे मॅडम यांचेकडे हजर केल्या असता, सदर नोटांचे क्रमांक हे सापळा पथकाचे मदतीने लिहून घेवून त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रकीया पुर्ण झाल्यानंतर लाचेची रक्कम ही माझे शर्टाचे डाव्या बाजुचे खिश्यात ठेवून दिली. त्यावेळी घोगरे मॅडम यानी मला व पंचाना सापळा कार्यवाही बाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यावेळी मी घोगरे मॅडम याना सांगीतले की, सोपान डहाळके हा माझे गावातील व्यक्ती असून मी जर त्याच्याकडे लाच रक्कम दिली तर आमचे गावातील संबंध खराब होतील. तरी मी लोकसेवक श्री. सोसे साहेब यांना फोन करून त्यांनाच लाच रक्कम देतो अशी विनंती केली. त्यानुसार सर्वानुमते लोकसेवक श्री सोसे यांना फोन करून ते ज्याठिकाणी बोलावतील त्याठिकाणी सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार मी व सापळा पथक असे सर्व साहीत्यासह ग्राम बिबी येथील बिबी ते किनगावजट्टू रोडवर असलेल्या धान्य मार्केट समोर येवून थांबून राहीलो. त्यावेळी घोगरे मॅडम यानी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी सोसे साहेब यांना फोन लावून पैश्याची व्यवस्था करून बिबी येथे आलो असल्याबाबत सांगीतले असता लोकसेवक श्री. सोसे साहेब मला म्हणाले की, कोठे येतो, त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, बिबी येथील किनगांवजट्टू चौफुलीवर येतो असे म्हटल्यावर लोकसेवक सोसे यांनी मला किनगांवजट्टू चौफुलीवर असलेल्या माऊली हॉटेलवर ये, आलोच दहा मिनीटात असे म्हटल्याने सर्वानुमते बिबी येथील सेवालाल चौकात असलेल्या माऊली हॉटेलमध्ये सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार घोगरे मॅडम यानी माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून सापळा पथकातील कर्मचारी यांचे करवी माझे गळ्यात शर्टाचे आतुन बाहेरून दिसणार नाही असे लटकावून दिले. त्यानंतर मला व पंच क्र. 1 श्री. इंगळे यांना माझे मोटार सायकलने माऊली हॉटेलकडे 13.51 वा. रवाना केले. त्यावेळी आमचे मागोमाग घोगरे मॅडम तसेच सापळा पथक व पंच क्र. 2 श्रीमती महाले असे शासकिय वाहनाने बिबी येथील सेवालाल चौकातील माऊली हॉटेलच्या थोड्या अंतरावर शासकिय वाहनातून उतरून माऊली हॉटेलच्या आजुबाजुला आपआपले अस्तित्व लपवुन उभे राहीले. त्यावेळी मी व पंच क्र. 1 श्री. इंगळे असे माऊली हॉटेलमध्ये जावून बसलो अशा

प्रकारे 13.51 वा रितसर सापळा आयोजीत केली. त्यानंतर थोडयाच वेळात लोकसेवक सोसे साहेब यांचा मला फोन आला व त्यांनी मला माऊली हॉटेलच्या बाजुला असलेल्या किनगांव जटटू ते बिबी रोडवर शिव जेन्टस पार्लर समोर बोलाविल्याने मी व पंच असे हॉटेलमधून उठून किनगांव जटटू ते बिबी रोडवर असलेल्या शिव जेन्टस पार्लर समोर गेलो असता त्याठिकाणी सोसे साहेब व त्यांचे सोबत पोलीस स्टेशन बिबी येथील सफाई कामगार श्री. उबाळे हजर होते. त्यावेळी आमच्यात इतर बोलणी झाली त्यावेळी लोकसेवक श्री सोसे यांनी मला पैसे देण्याबाबत उजव्या हाताचे बोटे हलवून "देवून टाका त्यांच्याकड (सफाई कामगार उबाळे यांचेकडे पैसे देण्याबाबत सांगीतले)* असे म्हणून लोकसेवक सोसे यांचे सोबत आलेले सफाई कामगार उबाळे यांना "ए घे रे ते" ( पैसे घेण्याबाबत सांगीतले) त्यावेळी मी माझे शर्टाचे खिश्यातील लाचेची रक्कम काढून उजव्या हाताने सफाई कामगार उबाळे यांचेसमोर धरली असता उबाळे यांने त्याच्या उजव्या हाताने लाचेची रक्कम 3500/- रुपये स्विकारुन नेसल्या पॅन्टचे उजव्या बाजुचे खिश्यात ठेवून दिली. त्यावेळी मी सोसे साहेब यांना म्हणालो की, आता काही अडचन भग सर, त्यावेळी लोकसेवक सोसे म्हणाले की, आम्ही कश्याले बसेल आहे राजा, तुझ्यासाठी एवढी मरमर केली मायच्यान काय सांगाव तुला, तु बिनधास्त रहाय न टेन्शन नको घेवू असे म्हणाले. त्यावेळी मी डोक्यावरून हात फिरवून लाच स्विकारल्याबाबत नियोजित इशारा केला असता, पोउपअधि. श्रीमती घोगरे मॅडम व सापळा पथकातील सदस्य असे आमचे जवळ आले व त्यांनी लोकसेवक श्री. सोसे पोलीस कर्मचारी यांना तसेच त्यांचेसोबतचे सफाई कामगार उबाळे यांना माझेकडून लाच रक्कम स्विकारले प्रकरणी ताब्यात घेवून सोसे साहेब यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री ज्ञानबा राजाराम सोसे, वय 48 वर्ष पद पोलीस कॉन्स्टेबल, ब.नं. 387, वर्ग-3, पोलीस स्टेशन बिबी. रा. बालाजी नगर, देऊळगावराजा असे सांगीतले. त्यानंतर घोगरे मॅडम यांनी सफाई कामगार श्री. उबाळे यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव विजय फकिरा उबाळे, वय 35 वर्ष पद सफाई कामगार (अंशकालीन), पोलीस स्टेशन बिबी, रा. बिबी, ता. लोणार, जि. बुलढाणा असे सांगीतले. त्यानंतर झालेल्या कार्यवाहीचा

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

SADANAND GOVINDRAO SONKAMBLE(I (Inspector)) / 8OBN84507 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी लोकसेवक श्री. ज्ञानबा राजाराम सोसे, वय ४८ वर्ष, पद पोलीस कॉन्स्टेबल, ब.नं. ३८७, वर्ग—३, पोलीस स्टेशन बिबी, रा. बालाजी नगर, देऊळगांवराजा यांनी माझे व माझे नातेवाईकांविरुध्द निघालेल्या जमानती वॉरन्ट मध्ये अटक न करण्यासाठी आज दिनांक २९.१०.२०२३ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान तडजोडीअंती ३५००/— रुपये लाचेची मागणी करुन दिनांक २९.१०.२०२३ रोजी आयोजीत करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री.ज्ञानबा सोसे यांचे सांगणे वरुन लोकसेवक श्री. विजय फकिरा उबाळे, वय ३५ वर्ष, पद सफाई कामगार (अंशकालीन), पोलीस स्टेशन बिबी, रा. बिबी, ता.लोणार, जि. बुलढाणा यांनी ग्राम बिबी येथील सेवालाल चौकातील बिबी ते किनगाव जटटू रोडवरील शिव जेन्टस पार्लर समोर १३.५१ ते १४.०७ वा. स्विकारली आहे. वरुन लोकसेवक श्री. ज्ञानबा राजाराम सोसे, पद पोलीस कॉन्स्टेबल, व लोकसेवक श्री. विजय फकिरा उबाळे, पद सफाई कामगार (अंशकालीन कर्मचारी) यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद देत आहे.

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SADANAND GOVIND
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN84507

N.C.R.B (एन.सी.आर.बी.)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**